# पनवेल महानगरपालिका

**वैदयकीय आरोग्य विभाग**

**कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी,**
**पनवेल -४१०२०६.**

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२
वैद्यकीय आरोग्य विभाग : ०२२ – २७४५५७५१
ई-मेल : mohpmc05@gmail.com

फॅक्स नं. : ०२२- २७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९
वेबसाईट: www.panvelcorporation.com


जा.क्र./पमपा/वै.आ.वि/४२७७/सन २०२४-२५

दिनांक:१४/०८/२०२४

## सेवाजेष्ठता यादीबाबत सुचना

शासन अधिसुचना दि. २१/०६/२०२४ व शासन पत्र क्र. एनएचएम-११२४/प्र.क्र.२४५/आरोग्य- ७ दिनांक ३०/०७/२०२४ अन्वये राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत दिनांक ०१/०१/२०२४ रोजी कार्यरत कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांची सेवा जेष्ठता यादी तयार करण्याबाबत मार्गदर्शक सुचना प्राप्त झाल्या आहेत. या अनुषंगाने, मा. सहसंचालक (अतांत्रिक) राआअ मुंबई यांचे पत्र क. राआसों/ आस्था/ सेवा जेष्ठत्र यादी/४३१४४-४८३/२४ दिनांक ३१/०७/२०२४ अन्वये सदर शासन मार्गदर्शक सुचनांच्या अधिन राहून कार्यालयातील राष्ट्रीय आरोग्य अभियान अंत्तर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांची विहित नमुन्यात सेवा जेष्ठता यादी तयार करुन प्रसिध्द करण्याबाबत सुचित केलेले आहे.

यानुसार, पनवेल महानगरपालिका, वैदयकीय आरोग्य विभागातील राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, १५ वा वित्त आयोग व हिंदु हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे "आपला दवाखाना" अंतर्गत मंजुर पदांच्या अधिन राहुन दिनांक ०१/०१/२०२४ रोजी पर्यंत कार्यरत कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांची विहित नमुन्यात हंगामी सेवा जेष्ठता यादी तयार करण्यात आलेली आहे. सदर हंगामी सेवा जेष्ठता यादी महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर (https://www.panvelcorporation.com) प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर हंगामी सेवा जेष्ठता यादीमध्ये राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, १५ वा वित्त आयोग व हिंदु हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे "आपला दवाखाना" अंतर्गत दि. १/०१/२०२४ रोजीपर्यंत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या नावासमोर नमूद केलेल्या माहितीबाबत आपली काही हरकत असल्यास सोबत जोडलेल्या आक्षेप अर्जामध्ये लेखी स्वरुपात व योग्य त्या पुराव्याचे आवश्यक दस्तऐवजासह या कार्यालयास दिनांक २१/०८/२०२४ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत या कार्यालयाचे पत्यावर (पनवेल महानगरपालिका, वैदयकीय आरोग्य विभाग मुख्यालय, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल - ४१०२०६) समक्ष येऊन आक्षेप सादर करावेत. पोस्टाने, ईमेलवर किंवा अन्य मार्गाने सादर केलेले आक्षेप व हरकती अर्ज स्विकारले जाणारी नाहीत. याची सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी नोंद घ्यावी.

योग्य त्या पुराव्यासह विहित कालावधीत आक्षेप नोंदविण्याची जबाबदारी ही संबंधित अधिकारी व कर्मचारी यांची राहील. याबाबत या कार्यालगामार्फत इतर कोणताही पत्रव्यवहार / संपर्क केला जाणार नाही. मुदती नंतर प्राप्त आक्षेप व हरकती स्विकारल्या जाणार नाहीत. कार्यालयास प्राप्त आक्षेप व हरकती विचारात घेऊन अंतिम सेवा जेष्ठता यादी व या बाबतच्या पुढील सुचना महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

(डॉ. आनंद गोसावी)
**वैदयकीय आरोग्य अधिकारी**
**पनवेल महानगपालिका**

Scanned with OKEN Scanner

# आक्षेप / हरकत विनंती अर्ज

दिनांक :-

प्रति,
मा. वैदयकीय आरोग्य अधिकारी,
पनवेल महानगरपालिका,
पनवेल.

विषय :- पनवेल महानगरपालिका, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान / १५ वा वित्त आयोग / हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे "आपला दवाखाना" अंतर्गत कार्यरत कंत्राटी ............................................... पदाच्या प्रसिध्द केलेल्या हंगामी सेवा जेष्ठता यादीमध्ये नमुद माहिती संबंधित आक्षेप / हरकत सादर करणेबाबत.

मा. महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास सविनय विनंती करण्यात येते की, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान / १५ वा वित्त आयोग / हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे "आपला दवाखाना" अंतर्गत प्रसिध्द करण्यात आलेल्या हंगामी सेवा जेष्ठता यादीमध्ये माझे /............................................... (अन्य अधिकारी / कर्मचारी असल्यास त्याचे नाव लिहावे) या नावासमोर नोंद केलेल्या माहितीमध्ये खालीलप्रमाणे त्रुटी असल्याचे दिसुन येत आहे.

| अ.क्र. | प्रसिध्द केलेल्या हंगामी सेवा जेष्ठता यादीमधील क्रमांक | यादीमध्ये नमुद माहितीचा तपशील | त्याऐवजी करावयाची दुरूस्ती |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

या आक्षेप संबंधित माझेकडे सदर बाबीचे / माहिती बाबत वैध दस्तऐवज असुन मी या अर्जा सोबत पुरावा म्हणुन जोडत आहे. तरी या सादर केलेल्या आक्षेप / हरकती बाबत तपासणी व पडताळणी करून योग्य ते बदल करावेत, हि विनंती.

सहपत्र — १) ...............................................

२) ...............................................

३) ...............................................

(अधिकारी / कर्मचारी स्वाक्षरी)

संपुर्ण नाव व पदनाम...............................

...............................................................

Scanned with OKEN Scanner

| पनवेल महानगरपालिका, हिंदु ह्दयसम्राट बाळासाहेब ठाकरे "आपला दवाखाना" | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदाचे नाव- वैद्यकीय अधिकारी | | | | | | | | | |
| सुसूत्रीकरणानुसार मंजुर मानधन- 60,000 | | | | | | | | | |
| दि.०१ जानेवारी २०२४ रोजीची हंगामी सेवा ज्येष्ठता सूची | | | | | | | | | |
| अ.क्र./ज्येष्ठता क्र. | अधिकारी व कर्मचा-यांचे नाव | संबंधित पदावरील नियुक्तीचा मार्ग | जन्मतारीख | प्रवर्ग | प्रत्यक्ष रुजु दिनांक | ज्येष्ठतेचा दिनांक | सेवानिवृत्ती दिनांक | शैक्षणिक अर्हता | शेरा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| 1 | डॉ. खटकाळे उदयसिंग उत्तम | पनवेल महानगरपालिका स्तर | 09-09-1988 | खुला | 20-01-2023 | 01-01-2024 | | MBBS | |
| 2 | डॉ. शेळके रवि नामदेव | पनवेल महानगरपालिका स्तर | 06-10-1996 | अ.जा | 28-02-2024 | 01-01-2024 | | MBBS | |

Medical Officer Of Health
Panvel Municipal Corporation

१७१

Scanned with OKEN Scanner

| पनवेल महानगरपालिका, हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे "आपला दवाखाना" | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदाचे नाव- अधिपरीचारीका | | | | | | | | | |
| सुसूत्रीकरणानुसार मंजुर मानधन- २०,००० | | | | | | | | | |
| दि.०१ जानेवारी २०२४ रोजीची हंगामी सेवा ज्येष्ठता सूची | | | | | | | | | |
| अ.क्र./ ज्येष्ठता क्र. | अधिकारी व कर्मचा-यांचे नाव | संबंधित पदावरील नियुक्तीचा मार्ग | जन्मतारीख | प्रवर्ग | प्रत्यक्ष रुजु दिनांक | ज्येष्ठतेचा दिनांक | सेवानिवृत्ती दिनांक | शैक्षणिक अर्हता | शेरा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| 1 | श्रीम. पारधी यशश्री भाऊ | पनवेल महानगरपालिका स्तर | 31-01-2000 | अ.ज | 08-08-2023 | 01-01-2024 | 29-06-2024 | GNM | सदर कर्मचारी यांनी दि. 29.06.2024 नंतर पुढिल कालावधी करीता पुर्ननियुक्ति घेण्यास इच्छुक नसलेबाबत या कार्यालयास कळविण्यात आले आहे. त्यानुसार संबंधित कर्मचारी यांना सदर पदावरुन दि. 29.06.2024 रोजी कार्यमुक्त करण्यात आले आहे. |

Medical Officer Of Health
Panvel Municipal Corporation

Scanned with OKEN Scanner

| पनवेल महानगरपालिका, हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे "आपला दवाखाना" | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदाचे नाव- बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी | | | | | | | | | |
| सुसूत्रीकरणानुसार मंजुर मानधन- १५५०० | | | | | | | | | |
| दि.०१ जानेवारी २०२४ रोजीची हंगामी सेवा ज्येष्ठता सूची | | | | | | | | | |
| अ.क्र./ज्येष्ठता क्र. | अधिकारी व कर्मचा-यांचे नाव | संबंधित पदावरील नियुक्तीचा मार्ग | जन्मतारीख | प्रवर्ग | प्रत्यक्ष रुजु दिनांक | ज्येष्ठतेचा दिनांक | सेवानिवृत्ती दिनांक | शैक्षणिक अर्हता | शेरा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| 1 | कांबळे बिपीन संजय | पनवेल महानगरपालिका स्तर | 26-04-1996 | अ.जा | 12-02-2023 | 01-01-2024 | | B.SC + Sanitory Inspector | |

Medical Officer Of Health
Panvel Municipal Corporation

Scanned with OKEN Scanner